Lokneta News - लोकनेता न्युज

महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड **लोकनेता**

मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे




शुक्रवार ५ जून २०२६ | RNI-MAHMAR/2023/89402 | Email : dnyaneshmofficial@gmail.com | वर्ष : ०३ अंक : २८६ | किंमत २ रुपये | 7499615933

# कर्जमाफीचा खुळखुळा? सरसकट कर्जमाफी नाहीच

## १२.७१ लाख शेतकऱ्यांना मोठा फटका, सरकारचा तो निर्णय वादात

### 2019 मध्ये कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना केवळ 50 हजारांची मदत देण्याचा राज्य सरकारचा निर्णय वादात

राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांसाठी महायुतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेला कॅबिनेटमध्ये मंजूरी दिली. पण योजनेतील अटी आणि शर्तींने शेतकऱ्यांची डोकेदुखी वाढली आहे. अनेक शेतकऱ्यांना या योजनेचा पूर्ण फायदा मिळणार नसल्याचे समोर येत आहे. या योजनेत 55 लाख 72 हजार शेतकऱ्यांचा





सातबारा कोरा करण्याचा सरकारचा दावा आहे. या योजनेसाठी 36 हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तर अटींमुळे वाद पेटला आहे. राज्यातील 12 लाख 71 हजार शेतकऱ्यांना मोठा फटका बसण्याचा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकरी नेते हा कर्जमाफीचा खुळखुळा असल्याचा आरोप करत



आहेत. कर्जमाफीचा आला शासन निर्णय या कर्जमाफी योजनेत मुद्दल आणि व्याजासह दोन लाखांच्या आतील शेतकऱ्यांचं संपूर्ण कर्ज माफ होणार आहे. दोन लाखांपेक्षा कमी कर्ज असलेले 16 लाख 48 हजार शेतकरी पूर्णपणे कर्जमुक्त होणार आहे. त्यांचा सातबारा कोरा होणार आहे. सरकारच्या तिजोरीवर 14 हजार 754 कोटींचा आर्थिक बोजा पडणार आहे. या योजनेत कर्जमाफी, प्रोत्साहनपर लाभ तर मागील योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना मदत असे तीन प्रमुख घटक समोर आले आहे. या योजनेचा शासन निर्णय काल काढण्यात आला. त्यात योजनेचा तपशील समोर आला आहे.

### 12 लाख 71 हजार शेतकऱ्यांच्या तोंडाला पुसली पाने

राज्य सरकारने 30 सप्टेंबर 2025 रोजीपर्यंतचे दोन लाखांचे कर्ज माफ करण्याचे धोरण ठरवले आहे. पण महाविकास आघाडीने राबवविलेल्या महात्मा फुले कर्जमाफी योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना मोठा फटका बसणार आहे. 2019 मध्ये कर्जमाफी घेतलेले शेतकरी, ज्यांची संख्या तब्बल 32 लाख 29 हजार इतकी आहे, जरी ते यावेळी थकित असले तरी त्यांना केवळ 50 हजार रुपयांच्या मर्यादेत कर्जमाफी देण्यात येणार आहे. नियमित कर्जदारांना सुद्धा केवळ 50 हजार रुपये देण्यात येणार आहेत. त्यांनाही किमान दोन वर्ष नियमित कर्जदार असणे ही अट टाकण्यात आली आहे. त्यामुळे यापूर्वी कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या 12 लाख 71 हजार शेतकऱ्यांना केवळ 50 हजारांची मदत करण्याचा निर्णय वादात सापडला आहे. प्रत्यक्षात दोन लाखांच्या आत थकीत कर्जदार 16 लाख 48 हजार शेतकऱ्यांनाच या योजनेचा खऱ्या अर्थाने लाभ होण्याचा दावा करण्यात येत आहे. विरोधकांनी या जाचक अटींवर टीकेची झोड उठवली आहे.

### आता भेदभाव का?

2014 मध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आली होती. त्यानंतर 2019 मध्ये या शेतकऱ्यांना महाविकास आघाडीने कर्जमाफीचा लाभ दिला होता. पण आता कर्जमाफी देताना 2019 मध्ये कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना केवळ 50 हजारांची मदत देण्याचा राज्य सरकारचा निर्णय वादात सापडला आहे. तर दोन लाखांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या 2 लाख 90 हजार शेतकऱ्यांनाही या कर्जमाफीचा लागलीच लाभ मिळणार नाही. त्यांना दोन लाखांवरील कर्ज फेडावे लागेल. तरच ते या योजनेसाठी पात्र ठरतील.

## छत्रपती संभाजीनगरात FDAची धडक कारवाई,36 लाखांचे एनर्जल पेय जप्त




**लोकनेता न्युज नेटवर्क**
छ.संभाजीनगर | डॉ.ज्ञानदेव चेपटे

छ.संभाजीनगर,दि.४:छ. संभाजीनगरातील अन्न व औषध प्रशासनाने वाळूज एमआयडीसी येथील एफडीसी लिमिटेड कंपनीवर कारवाई करत "एनर्जल" या एनर्जी अँड इलेक्ट्रोलाइट पेयाच्या 84,992 बाटल्या जप्त केल्या. जप्त साठ्याची किंमत 36 लाख 172 रुपये आहे. अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाच्या सूचनेनुसार हे उत्पादन "मिसब्रँडेड" आढळल्याने कारवाई करण्यात आली. अन्न सुरक्षा अधिकारी पी. एस. कुचेकर व पी. पी. सुरसे यांनी ही कारवाई केली. ग्राहकांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी अशा कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने सांगितले.

## खडकवासला कालव्याचे उन्हाळी आवर्तन तात्काळ सुरु करा प्रदीप गारटकर,प्रविण माने यांची मागणी

**लोकनेता न्युज नेटवर्क**
इंदापूर,पुणे(बबनराव धायतोंडे)

:- इंदापूर तालुक्यात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या पाणीटंचाईच्या गंभीर परिस्थितीमुळे शेतकरी,ग्रामीण नागरिक आणि पशुपालक मोठ्या संकटाचा सामना करत आहेत.या पार्श्वभूमीवर खडकवासला कालव्यातून इंदापूर तालुक्यासाठी उन्हाळी आवर्तन तात्काळ सुरू करण्यात यावे,अशी मागणी अधीक्षक अभियंता,पुणे पाटबंधारे मंडळ श्री. पृथ्वीराज फाळके आणि कार्यकारी अभियंता खडकवासला पाटबंधारे विभाग,सिंचन भवन पुणे,श्री. किरण देशमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. इंदापूर तालुक्यातील बहुतांश शेती ही खडकवासला कालव्याच्या पाण्यावर अवलंबून आहे.यंदाच्या उन्हाळ्यात पाण्याची उपलब्धता अत्यंत कमी झाल्याने ऊस,डाळिंब,भाजीपाला तसेच इतर हंगामी पिकांवर मोठे संकट ओढवले आहे.अनेक शेतकऱ्यांनी मोठा खर्च करून पिकांची लागवड केली असली तरी पाण्याअभावी ही पिके जळण्याच्या मार्गावर आहेत. परिणामी शेतकऱ्यांवर मोठ्या आर्थिक नुकसानीची टांगती तलवार निर्माण झाली आहे. याशिवाय तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे.अनेक विहिरी,कूपनलिका आणि बोअरवेल कोरड्या पडल्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना पाण्यासाठी मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत.पशुधनासाठीही पुरेशा पाण्याचा अभाव जाणवत असून जनावरांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. सध्या हवामानातील वाढते तापमान आणि उपलब्ध जलस्रोतांची घटती पातळी लक्षात घेता परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.वेळेत कालव्याचे पाणी



उपलब्ध न झाल्यास शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याबरोबरच ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक बिकट होऊ शकतो.त्यामुळे शेतकरी व नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण होत आहे.
या पार्श्वभूमीवर संबंधित सिंचन विभागाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा आणि इंदापूर तालुक्यास खडकवासला कालव्याचे उन्हाळी आवर्तन त्वरित सुरू करून पाणी उपलब्ध करून द्यावे,अशी जोरदार मागणी करत भाजपा शिष्टमंडळाने अधिकाऱ्यांना अगदी धारेवर धरले.शेतकरी,नागरिक आणि पशुधनाच्या हितासाठी प्रशासनाने तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात,अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे. इंदापूर तालुक्यातील हजारो शेतकरी आणि नागरिकांचे जीवनमान या निर्णयावर अवलंबून असल्याने प्रशासनाने मानवीय दृष्टिकोनातून त्वरित कार्यवाही करावी,अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी भाजपचे जेष्ठ नेते प्रदीप गारटकर,प्रविण माने,आकाश कांबळे, गजानन वाकसे,मारुती वणवे,किरण गाणबोटे,राम आसबे,तेजस देवकाते, राजकुमार जठार,गणेश राऊत,अनिल पवार,अतुल शेटे पाटील,संजय शिंदे, वसीम बागवान,सुधाकर ढगे,यशवंत कचरे,सचिन शिरसट इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ठाकरे गटाच्या सेनेकडून देवयानी डोणगावकर आणि कृष्णा डोणगावकर यांची हकालपट्टी




**लोकनेता न्युज नेटवर्क**
छ.संभाजीनगर | डॉ.ज्ञानदेव चेपटे

छत्रपती संभाजीनगर,दि.४:छत्रपती संभाजीनगर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाच्या शिवसेनेकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेतलेल्या देवयानी डोणगावकर आणि जिल्हा परिषद सदस्य कृष्णा डोणगावकर यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. पक्षाविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत ही कारवाई करण्यात आल्याची माहिती ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी सोशल मीडियावरील पोस्टद्वारे दिली आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आल्याचेही संबंधित पोस्टमध्ये नमूद करण्यात आले आहे. या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील राजकीय घडामोडींना वेग आला असून राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

## माजी सैनिक लालबा पिल्लेवाड यांचे हृदयविकाराने निधन; दोन दिवसांपूर्वीच मुलाचाही मृत्यू –

### पिल्लेवाड कुटूबावर दुहेरी शोककळा

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
*मुखेड | प्रतिनिधी,

मुखेड येथील आदिवासी कोळी महादेव समाजातील माजी सैनिक तथा शासकीय उपजिल्हा रुग्णालयात मेस्को कंपनीअंतर्गत सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत असलेले लालबा माधव पिल्लेवाड (वय 51) यांचे आज हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली असून विविध स्तरांतून हळहळ व्यक्त होत आहे.

कुटुंबावर दुहेरी दुःखाचा आघात
विशेष म्हणजे, अवघ्या दोन दिवसांपूर्वीच त्यांचा मुलगा अभिषेक पिल्लेवाड (वय 25) याचे निधन झाले होते. मुलाच्या अकाली जाण्याच्या धक्क्यातून सावरत असतानाच घरातील कर्ता पुरुष हरपल्याने पिल्लेवाड कुटुंबावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला आहे.

सेवाभावी व्यक्तिमत्त्व
लालबा पिल्लेवाड यांनी भारतीय सैन्यात देशसेवा बजावली. सेवानिवृत्तीनंतर ते शासकीय उपजिल्हा रुग्णालय, मुखेड येथे मेस्को कंपनीअंतर्गत सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत होते. कर्तव्यनिष्ठ स्वभाव आणि सर्वांशी जिव्हाळ्याचे संबंध यामुळे ते परिचित होते.

अंत्यविधीस शासकीय मानवंदना
त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुली असा परिवार आहे. निधनाची वार्ता समजताच नातेवाईक, मित्रपरिवार, सहकारी कर्मचारी आणि नागरिकांनी निवासस्थानी मोठी गर्दी केली.

चाकूर येथील बीएसएफ कॅम्पमधील अधिकारी अंत्यविधीस उपस्थित राहून त्यांना शासकीय इतमामात श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी तहसील, पोलीस विभागाचे अधिकारी-कर्मचारी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी,पत्रकार, लोकप्रतिनिधी आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सैनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा राजे छत्रपती अकॅडमीचे संचालक ज्ञानेश्वर पाटील डुमणे




यांनी विद्यार्थ्यांसह श्रद्धांजली वाहिली.

दिवंगत लालबा पिल्लेवाड हे कुलदिप पिल्लेवाड व पत्रकार संघटनेचे माजी तालुकाध्यक्ष संदीप पिल्लेवाड यांचे काका होते. शोकाकुल वातावरणात मोठ्या संख्येने नागरिकांच्या उपस्थितीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

एका माजी सैनिक, कर्तव्यदक्ष कर्मचारी आणि प्रेमळ कुटुंबप्रमुखाच्या जाण्याने मुखेड तालुक्याने मोठी पोकळी अनुभवली आहे. भावपूर्ण श्रद्धांजली.

## हुमणी नियंत्रणासाठी प्रकाश सापळे, भरघोस उत्पादनासाठी बीज प्रक्रिया;

### शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
इंदापूर | अनिल खाडे

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व योग्य नियोजन करून आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, या उद्देशाने म्हसोबाची वाडी येथे शेतकरी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिवाजी काळे यांच्या शेतावर आयोजित या कार्यक्रमात हुमणी नियंत्रण, प्रकाश सापळ्यांचा वापर, बीज प्रक्रिया तसेच बियाण्यांची उगवण क्षमता तपासणी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी उपस्थित राहून या मार्गदर्शनाचा लाभ घेतला. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी सचिन मोरे यांनी मका, ऊस तसेच इतर खरीप पिकांमध्ये आढळणाऱ्या हुमणी अळीच्या प्रादुर्भावाबाबत सखोल माहिती दिली. हुमणी अळी ही जमिनीत राहून पिकांच्या मुळांवर उपजीविका करणारी कीड असून त्यामुळे पिकांची वाढ खुंटते, रोपे पिवळी पडतात आणि उत्पादनात मोठी घट होऊ शकते. त्यामुळे हुमणी नियंत्रणासाठी वेळेवर उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.
पावसाच्या पहिल्या सरीनंतर हुमणीचे भुंगेरे जमिनीतून बाहेर पडतात. हे भुंगेरे प्रकाशाकडे आकर्षित होत असल्याने प्रकाश सापळ्यांचा वापर हा हुमणी नियंत्रणासाठी प्रभावी उपाय असल्याचे मोरे यांनी सांगितले. प्रकाश सापळ्यांच्या माध्यमातून भुंगेरे नष्ट केल्यास पुढील पिढीतील हुमणी अळ्यांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात रोखता येतो. गावपातळीवर सामूहिकरीत्या प्रकाश सापळे उभारल्यास अधिक प्रभावी नियंत्रण मिळू शकते, असेही त्यांनी नमूद केले.
खरीप हंगामात पिकांची चांगली आणि एकसमान उगवण होण्यासाठी बीज प्रक्रिया करणे



अत्यंत आवश्यक असल्याचे मोरे यांनी स्पष्ट केले. बीज प्रक्रियेमुळे बियाण्यांवरील बुरशीजन्य व रोगकारक घटकांचे नियंत्रण होते. त्यामुळे रोपांची वाढ जोमदार होऊन उत्पादनात वाढ होण्यास मदत मिळते. कमी खर्चात अधिक फायदा देणारी ही पद्धत असल्याने प्रत्येक शेतकऱ्याने पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया करावी, असे आवाहन त्यांनी केले.
कार्यक्रमादरम्यान बियाण्यांची उगवण क्षमता घरच्या घरी कशी तपासावी याचे प्रात्यक्षिकही करून दाखवण्यात आले. कापड किंवा कागदाच्या सहाय्याने उगवण चाचणी घेऊन बियाण्यांची गुणवत्ता तपासण्याची पद्धत शेतकऱ्यांना समजावून सांगण्यात आली.
उगवण क्षमता कमी असल्यास पेरणीचे प्रमाण वाढविणे किंवा नवीन बियाण्यांची निवड करणे आवश्यक असल्याचे मार्गदर्शन करण्यात आले.
यावेळी संतुलित खत व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांची माहितीही शेतकऱ्यांना देण्यात आली. उपस्थित शेतकऱ्यांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. म्हसोबाची वाडी येथे आयोजित करण्यात आलेला हा मार्गदर्शन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. आगामी खरीप हंगाम अधिक यशस्वी आणि उत्पादनक्षम करण्यासाठी अशा प्रकारचे मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त ठरत असल्याची भावना उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

## नांदेडमध्ये लाचलुचपत विभागाचा यशस्वी सापळा: मुख्याध्यापक 50 हजारांची लाच घेताना रंगेहात

### उपशीर्षक: निती निकेतन शिक्षण संस्था पुन्हा वादाच्या भोवऱ्यात; राजकीय दबावामुळे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा तक्रारदाराचा आरोप

**लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड, 4 जून 2026 –**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मुखेड येथील हुतात्मा माधव विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेश गोविंदराव पडलवार (51) यांना 50,000 रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले. विमानतळ पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 च्या कलम 7 अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीला अटक करण्यात आली. काय आहे प्रकरण? शाळेतील लिपिक शरद अरुणराव कोल्हे (38) यांनी 3 जून रोजी लाचलुचपत विभागाकडे तक्रार दिली. तक्रारीनुसार, मुख्याध्यापक पडलवार यांनी शालेय खर्चाच्या नावाखाली जानेवारी ते मे 2026 या पाच महिन्यांचा 12,000 रुपये दरमहा हप्ता आणि बदली व नोटीस न देण्यासाठी एकूण 60,000 रुपयांची लाच मागितली होती. असा रचला सापळा तक्रार मिळताच पो. उपाधीक्षक प्रशांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पो. निरीक्षक माधुरी यावलीकर यांनी कारवाईचे आदेश दिले. 3 जून रोजी शासकीय पंचासह तक्रारदाराला आरोपीच्या शारदानगर, नांदेड येथील घरी पाठवण्यात आले. पंचासमक्ष 60,000 रुपये मागितल्यानंतर पडलवार यांनी तडजोडीत 50,000 रुपये स्वीकारून "यापुढे हप्ता नको, यातच तुझी बदली



करून घेतो" असे आश्वासन दिले. रक्कम स्वीकारताच ACB पथकाने त्यांना रंगेहात पकडले. झडतीत काय मिळाले? आरोपीच्या अंगझडतीत विवो मोबाईल, सोन्याची अंगठी, आधार-पॅन-मतदान कार्ड आणि 5,500 रुपये रोख जप्त केले. घरझडती सुरू असून मोबाईलचीही तपासणी होणार आहे. संस्था पुन्हा वादात हुतात्मा माधव विद्यालय चालवणारी निती निकेतन शिक्षण संस्था यापूर्वीही वादात राहिली आहे. समाज कल्याण, शिक्षण विभाग आणि धर्मादाय आयुक्तांकडे संस्थेविरोधात अनेक तक्रारी प्रलंबित आहेत, काही न्यायालयीन निकालही संस्थेविरुद्ध लागले आहेत. तक्रारदार शरद कोल्हे यांनी सांगितले, "संस्थेची सखोल चौकशी झाल्यास अनेक गंभीर बाबी उघड होतील. मात्र संस्थाचालकांच्या राजकीय दबावामुळे आणि आर्थिक हितसंबंधांपोटी प्रशासन कारवाई करत नाही, त्यामुळेच असे प्रकार घडतात." पुढील तपास गुन्हा रजि. नं. 256/2026 नुसार विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, पुढील तपास पो. निरीक्षक प्रीती जाधव करत आहेत. सापळा पथक - सापळा अधिकारी: माधुरी यावलीकर, पो. निरीक्षक, ACB नांदेड - पर्यवेक्षण: प्रशांत पवार, पो. उपाधीक्षक, ACB नांदेड - तपास अधिकारी: प्रीती जाधव, पो. निरीक्षक, ACB नांदेड

सं पा द की य

## गरोदर महिलांना मिळणार 5,000 रुपये

गरोदरपणाच्या काळात महिलांना चांगला आहार आणि वैद्यकीय उपचार मिळावेत यासाठी सरकार पीएमएमव्हीवाय (PMMVY) योजनेद्वारे 5,000 रुपयांचे आर्थिक साहाय्य थेट बँक खात्यात जमा करते. हे पैसे थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे टप्प्याटप्प्याने दिले जातात. या योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणती कागदपत्रे लागतात आणि ऑनलाईन अर्ज कसा करायचा, याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

केंद्र सरकारतर्फे प्रधानमंत्री मातृ वंदना योजना (PMMVY) चालवली जात आहे. ही प्लॅन प्रथम 2010 मध्ये सुरू करण्यात आली होती. 2017 मध्ये त्याचे नाव बदलण्यात आले. गर्भवती महिला आणि स्तनदा मातांना पौष्टिक आहारासाठी आर्थिक सहाय्य प्रदान करणे, त्यांच्या आरोग्य सेवांबद्दल जागरूकता वाढवणे आणि मुलींबद्दल सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

PMMVY योजनेंतर्गत सरकार गर्भवती महिलांना 5000 रुपये देते. प्रधानमंत्री मातृ वंदना योजना ही केंद्र सरकारची एक योजना आहे, जी गर्भवती महिला आणि स्तनदा मातांच्या आरोग्य आणि पोषण गरजा पूर्ण करण्यासाठी तयार केली गेली आहे.

ही रक्कम दोन हप्त्यांमध्ये उपलब्ध

2017 मध्ये सुरू करण्यात आलेल्या या योजनेचे उद्दिष्ट गरोदरपणात मातांची सुरक्षा वाढवणे, त्यांचे आरोग्य सुधारणे आणि बाळाच्या जन्मानंतर त्यांना योग्य पोषण मिळेल हे सुनिश्चित करणे हे आहे. या योजनेंतर्गत महिलांना त्यांच्या पहिल्या मुलासाठी 5000 रुपयांपर्यंत आर्थिक मदत दिली जाते.

ही रक्कम दोन हप्त्यांमध्ये दिली जाते. पहिल्या हप्त्यासाठी गरोदरपणाच्या नोंदणीनंतर 3000 रुपयांची आर्थिक मदत दिली जाते आणि बाळाच्या प्रसूतीपूर्वी किमान एक धनादेश दिला जातो. 2000 रुपयांचा दुसरा हप्ता मुलाच्या जन्मानंतर दिला जातो.

एकूण आर्थिक सहाय्य 11000 रुपये

दुसऱ्या अपत्यासाठी योजनेचा लाभ (6000 रुपये) तेव्हाच मिळतो जेव्हा दुसरे मूल मुलगी असेल. ही रक्कम मुलीच्या जन्मानंतर एकरकमी दिली जाते. अशा प्रकारे पात्र महिलेला सरासरी 6000-11000 रुपयांची मदत दिली जाते.

कोणत्या महिलांना फायदा होईल?

गरोदर महिलेचे वय किमान 19 वर्षे असणे आवश्यक आहे. याशिवाय कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 8 लाखांपेक्षा कमी असावे. जर महिलेकडे मनरेगा कार्ड असेल किंवा तिला पीएम किसान सन्मान निधीचा लाभ मिळत असेल तर तुम्ही या योजनेसाठी पात्र आहात. ज्या महिलांकडे ई-श्रम कार्ड किंवा बीपीएल कार्ड आहे किंवा अपंग लोक आहेत त्यांनाही या योजनेसाठी अर्ज करता येईल.

4 कोटींहून अधिक महिलांना लाभ

प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेंतर्गत देशभरातील 4 कोटींहून अधिक महिलांना किमान एका हप्त्याचा लाभ मिळाला आहे. सरकारने आतापर्यंत 19,028 कोटी रुपयांची रक्कम वितरित केली आहे. पत्र सूचना कार्यालयाच्या मते, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना (PMMVY) ही एक केंद्र पुरस्कृत प्लॅन आहे, जी मिशन शक्तीच्या 'सामर्थ्य' उप-योजनेंतर्गत चालवली जात आहे. माता आणि बाल आरोग्य सुधारणे हा त्याचा उद्देश आहे.

अर्ज कसा करावा ते जाणून घ्या

या योजनेचा लाभ घेण्यासाठी महिलेचे वय किमान 19 वर्षे असावे. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 8 लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. त्यासाठी पात्र महिलेला बाळाच्या जन्मापासून 270 दिवसांच्या आत अर्ज सादर करावा लागेल. पात्र लाभार्थ्यांना PMMVY च्या अधिकृत पोर्टल https://pmmvy.wcd.gov.in द्वारे ऑनलाइन अर्ज करावा लागेल किंवा जवळच्या अंगणवाडी केंद्र किंवा शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्रात ऑफलाइन अर्ज करावा लागेल. यासाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये बँक खात्याशी जोडलेले आधार कार्ड, बँक पासबुक, रेशन कार्ड किंवा उत्पन्न प्रमाणपत्र, एमसीपी कार्ड यांचा समावेश आहे.

# गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने सायकल रॅलीचे आयोजन.

लोकनेता न्युज नेटवर्क

सेवा पवार
जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली.

आरोग्य व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या सायकल रॅलीमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांसह 150 हून अधिक पोलीस अधिकारी/अंमलदार, जेष्ठ नागरिक व विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त सहभाग.

निरोगी जीवन आणि निसर्ग संवर्धनासाठी प्रत्येकाने सायकलचा अधिकाधिक वापर करावा... पोलीस अधीक्षक,एम. रमेश



संयुक्त राष्ट्रसंघाने सन - 2018 पासून 03 जून हा दिवस जागतिक सायकल दिन म्हणून घोषित केलेला आहे. तेव्हा पासून 03 जून हा दिवस जागतिक सायकल दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो. सायकल ही स्वस्त, विश्वासार्ह, स्वच्छ आणि पर्यावरणास अनुकूल असे शाश्वत वाहतुकीचे प्रभावी साधन असून नेहमीच सायकल चालविल्याने शारिरीक व मानसिक आरोग्य उत्तम राहण्यास मदत होते. नागरिकांमध्ये आरोग्य स्वास्थ्य विषयक जागरुकता निर्माण व्हावी व अधिकाधिक लोकांनी आपल्या दैनंदिन जीवनात सायकलीचा वापर करावा हा संदेश देण्यासाठी जागतिक सायकल दिनाच्या पाश्र्वभूमीवर गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

आज दि. 03 जून 2026 रोजी सकाळी 07.00 वा. पोलीस कवायत मैदान गडचिरोली ते इंदिरा गांधी चौकपर्यंत सायकल रॅलीचे आयोजन करण्यात येऊन सायकल रॅलीमध्ये पोलीस अधीक्षक, गडचिरोली, एम. रमेश, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. गडचिरोली, सुहास गाडे यांच्यासह इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार, जेष्ठ नागरिक व शालेय विद्याथ्र्यांनी सायकल रॅलीमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या सायकल रॅलीचा समारोप शहिद पांडु आलाम सभागृह येथे करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमादरम्यान सहभागींना पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात येऊन सर्व सहभागींचे कौतूक करण्यात आले. सदर कार्यक्रमाप्रसंगी पोलीस अधीक्षक, गडचिरोली, एम. रमेश यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, नियमित सायकल चालविल्यामूळे आरोग्य सुधारण्याबरोबरच पर्यावरण संवर्धनालाही मोठी मदत होते. बदलत्या परिस्थितीनूसार आणि शासनाच्या आवाहनाला प्रतीसाद देत आपण सर्वांनी किमान एक दिवस सायकलचा वापर करावा. यामुळे शारीरिक तंदुरुस्ती वाढण्यास, मानसिक आरोग्य सुधारण्यास तसेच निरोगी जीवनशैली अंगीकारण्यास प्रोत्साहन मिळेल. तसेच यावेळी पोलीस अधीक्षकांनी उपस्थितांना सायकलचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन करत जागतिक सायकल दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

सदर कार्यक्रमाप्रसंगी पोलीस अधीक्षक, गडचिरोली, एम. रमेश, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. गडचिरोली, सुहास गाडे, अपर पोलीस अधीक्षक (अभियान), कार्तिक मधिरा, अपर पोलीस अधीक्षक, अहेरी, हर्षवर्धन बी. जे. तसेच पोलीस उप-अधीक्षक (अभियान),विशाल नागरगोजे तसेच विशेष अभियान पथक व सर्व शाखांचे अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नागरी कृती शाखेचे पोउपनि. चंद्रकांत शेळके व सर्व पोलीस अंमलदार तसेच सर्व शाखांचे अधिकारी व अंमलदार यांनी अथक परिश्रम घेतले.

# निम्न पैनगंगा प्रकल्पाचा 29 वर्षांनंतरही तिढा कायम सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेकडे 95 गावांचे लक्ष

लोकनेता न्यूज नेटवर्क

किनवट:शेख शौकत

मराठवाडा आणि विदर्भाच्या सीमेवर वाहणाऱ्या पैनगंगा नदीवरील निम्न पैनगंगा (चिमटा) प्रकल्पाचा वाद आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचला असून १३ जुलै रोजी होणाऱ्या पुढील सुनावणीकडे बुडीत क्षेत्रातील ९५ गावांचे डोळे लागले आहेत.

२७ जून १९९७ रोजी महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पाला मंजुरी दिली तेव्हा त्याची किंमत १४०२ कोटी होती; जी आज तब्बल ४० हजार कोटींच्या घरात पोहोचली आहे. या प्रकल्पामुळे ९५ गावे पूर्णपणे पाण्याखाली जाणार असल्याने, निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समिती आणि स्थानिक जनतेचा याला तीव्र विरोध आहे.

निवडणूक प्रचारात हा प्रकल्प रद्द करून नदीपात्रात बंधारे बांधण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, त्याची पूर्तता झाली नाही. २०१२ पासून रखडलेल्या या कामाला २०२२ मध्ये युती सरकारने पुन्हा गती दिली. ते आजही सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. प्रकल्पाची पर्यावरण मंजुरी २०१७ मध्येच संपली असल्याचा दावा करत संघर्ष समितीने २०२३ मध्ये हरित लवादात याचिका दाखल केली होती. मात्र, सप्टेंबर २०२५ मध्ये निकाल शासनाच्या बाजूने लागला. या निकालाला आव्हान देत समितीने जानेवारी २०२६ मध्ये सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली.



१२ जुलैच्या सुनावणीकडे लक्ष

नुकत्याच झालेल्या २६ मे २०२६ च्या सुनावणीत प्रतिवादींनी पुन्हा प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी वेळ मागून घेतला. २५ गावांपैकी एकाही गावाचे अद्याप पुनर्वसन झालेले नाही, भूसंपादन नाही आणि जागेची निवडही झालेली नाही; मग शासन वेळ का वाढवून मागत आहे? ठेकेदाराला काम करण्यासाठीच हा वेळ मुद्दाम मागितला जात असल्याचा गंभीर आरोप संघर्ष समितीने केला आहे. आता १३ जुलैच्या सुनावणीत न्यायालय काय भूमिका घेते, याकडे बुडीत क्षेत्रातील जनतेचे आणि धरण विरोधी संघर्ष समितीचे लक्ष लागले आहे.

# 'इंडिया बुक ऑफ रेकॉड्‌र्स' मध्ये दोन वर्षांच्या सन्मयच्या नावाची नोंद.

लोकनेता न्युज नेटवर्क

नवीन पनवेल येथे वास्तव्यास असलेले श्री. सचिन तानाजी साळुंखे व सौ. शीतल सचिन साळुंखे यांच्या अवघ्या दोन वर्षीय चिमुकला सन्मय सचिन साळुंखे याच्या असामान्य स्मरणशक्तीची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉड्र्स २०२६ मध्ये करण्यात आली आहे. छोट्या सम्राटला विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले असून त्याचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. सन्मय भारताचे राष्ट्रीय चिन्ह, शरीराचे विविध अवयव, वाहने, फळे, भाज्या, बारा महिन्यांची नावे व वारांची नावे तसेच इतरही माहिती आत्मविश्वासाने स्पष्ट उच्चारांसह सांगण्यात पारंगत झाला आहे. या आनंदाच्या क्षणी दैनिक लोकनेताच्या प्रतिनिधीने सचिन साळुंखे व शीतल साळुंखे या दांपत्याची भेट घेतली व त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून विशेष मुलाखत घेतली आहे. * प्रश्न १:- सन्मय तुमच्या आयुष्यात येण्याआधीचा तुमचा प्रवास कसा होता? उत्तर:- आम्ही दोघेही नोकरी करत असल्यामुळे ऑफिस आणि घर असेच आमचे रूटीन होते. पण खरं सांगायचं झालं तर मला PCOD चा त्रास असल्यामुळे वैद्यकीय उपचारांनंतर लग्नाच्या सात वर्षांनी सन्मयचा जन्म झाला आणि आमच्या आयुष्याला एक नवे वळण मिळाले. * प्रश्न २:- सन्मयच्या या टॅलेंटबद्दल सर्वप्रथम तुम्हाला कधी लक्षात आले? उत्तर:- सन्मय तेव्हा चार महिन्यांचा होता. जन्मल्यापासून मी त्याला कृष्णमंत्र ऐकवायचे. तो ते लक्षपूर्वक ऐकायचा आणि छान हसायचा. नंतर तो स्वतः "ॐ" चा उच्चार करू लागला. तेव्हा मी त्याला फ्लॅश काड्र्स दाखवायला सुरुवात केली. तो अवघ्या नऊ महिन्यांचा असताना त्यांवरील गोष्टी अचूकपणे ओळखू लागला आणि आम्ही हे सातत्याने सुरू ठेवले. * प्रश्न ३:- सन्मयचा जन्म ते त्याचे रेकॉर्ड बुकमध्ये नाव नोंदवण्यापर्यंतचा प्रवास कसा होता? उत्तर:- हा प्रवास एक वर्षे अकरा महिन्यांचा होता. सन्मयची निरीक्षण करण्याची आणि पटकन शिकून घेण्याची क्षमता आम्हाला तो चार महिन्यांचा असतानाच लक्षात आली होती. त्यामुळे आम्ही त्याच्या कलेला प्रोत्साहन देत गेलो. शैक्षणिक खेळणी, फ्लॅश काड्र्स, शैक्षणिक खेळ तसेच मोबाईलवर शैक्षणिक गाणी, कविता यांचा आम्ही योग्य वापर केला. * प्रश्न ४:- मग या प्रवासात काही अडचणी (Challenges) आल्या का? उत्तर:- अडचणी तर होत्याच. घरी मी, सन्मय आणि त्याचे वडील असे तिघेच. त्यात त्यांचे शिफ्टमध्ये काम असल्यामुळे त्यांना सन्मयसाठी पुरेसा वेळ देता येत नव्हता. त्यामुळे सन्मयचे संपूर्ण रूटीन सांभाळून घरातील इतर कामेही मला करावी लागत होती. त्यामुळे माझी खूप धावपळ व्हायची. * प्रश्न ५:- कुटुंबातील आणि मित्रमंडळींचा यात काही सहभाग आहे का? उत्तर:- कुटुंबातील सहभागाबद्दल सांगायचे झाल्यास, सर्वात मोठा पाठिंबा माझ्या आईचा होता. मी तिला कधीही फोन केला की ती माझ्या मदतीसाठी घरी यायची. त्यामुळे मला सन्मयसाठी अधिक वेळ देता यायचा. * प्रश्न ६:- सन्मयचे रेकॉर्ड बुकमध्ये नाव नोंदवल्यानंतर तुम्हा आई-वडिलांना कसे वाटते? त्याच्या आणि आताच्या जीवनात काही बदल जाणवतो का? उत्तर:- सन्मयचे नाव रेकॉर्ड बुकमध्ये नोंदवल्यानंतर आणि त्याला IBR Achiever Award मिळाल्यानंतर आम्हाला खूप अभिमान वाटतो. आज सगळ्यांचा त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक झाला आहे. * प्रश्न ७:- तुम्ही पालकांना, समाजाला तसेच इतर होणाऱ्या आणि असलेल्या आई-वडिलांना काय संदेश द्याल? उत्तर:- आपण जसे घडवू तसे मूल घडते. मातीच्या गोळ्याला जसा आकार देऊ, तशी मूर्ती तयार होते याचे उत्तम उदाहरण तुमच्या समोर आहे. आजच्या काळानुसार आम्ही सुद्धा सन्मयला मोबाईल देतो, पण सुरुवातीपासूनच त्यावर फक्त शैक्षणिक व्हिडिओ, गाणी आणि कविता दाखवत आलो आहोत.




तंत्रज्ञानाचा वापर करायलाही शिकले पाहिजे, पण तो योग्य पद्धतीने केला पाहिजे. * प्रश्न ८:- सन्मयसाठी भविष्यात एक आई-वडील म्हणून तुमच्या काय अपेक्षा आहेत? उत्तर:- त्याच्या इच्छेनुसार तो ज्या क्षेत्रात जाईल, त्या क्षेत्रात त्याने उत्कृष्ट प्राविण्य मिळवावे ही आमची अपेक्षा आहे. तसेच समाजाचे आपण काही देणे लागतो ही भावना त्याच्यामध्ये असावी आणि त्याला जे शक्य होईल ते त्याने समाजासाठी करावे. सन्मयबद्दल अजून एक गोष्ट सांगायला मला आवडेल. तो आता दोन वर्षांचा आहे. आम्ही त्याला आजपर्यंत चॉकलेट, चिप्स, बिस्किटे, कोल्ड ड्रिंक्स अशा गोष्टींपासून दूर ठेवले आहे. त्याला फक्त घरचे, पौष्टिक आणि संतुलित अन्न दिले जाते. शेवटचा प्रश्न... * सन्मयसाठी: बाळा, तुला मोठे झाल्यावर काय व्हायचे आहे? सन्मयच्या आईची इच्छा आहे की त्याने शास्त्रज्ञ व्हावे. वडिलांची इच्छा आहे की त्याने वर्ग-१ अधिकारी (Class I Officer) व्हावे. शेवटी, त्याची स्वतःची आवड आणि इच्छा ज्या क्षेत्रात असेल, त्याच क्षेत्रात त्याने प्रगती करावी हीच आमची अपेक्षा. -----**------ ' आईच्या गर्भात उमगली झुंजाराची रीत ',कवी जगदीश खेबुडकरांच्या या गीतातील ओळींची प्रचिती आज आली.साळुंखे दांपत्याने समाजाला एक आदर्श विचार दिला आहे.नक्कीच ही मुलाखत समाजास सकारात्मक बदल घडवेल अशी खात्री आहे. दैनिक लोकनेता परिवारातर्फे सन्मय च्या पुढील भविष्यातील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा....! कुणाल साळुंके, चित्रपट समीक्षक/ मुलाखतकार

# मनोर - वाडा - भिवंडी मार्गावरील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर उपाययोजना कराव्यात, यासाठी उपोषणाचा इशारा

## वाडा तालुक्यातील अंतर्गत अपूर्ण रस्त्यांची कामेही पूर्ण करण्याची मागणी

दै. लोकनेता न्यूज नेटवर्क




लोकनेता न्यूज नेटवर्क
पालघर - श्री तुषार भोईर

वाडा - मनोर - वाडा - भिवंडी मार्गावरील अपूर्ण कामामुळे दिवसेंदिवस अपघातांची संख्या वाढत असून पावसाळ्याच्या पार्शवभूमीवर या रस्त्यावर आवश्यक उपाययोजना कराव्यात व वाडा तालुक्यातील अंतर्गत रस्त्यांची अपूर्ण कामे त्वरीत पूर्ण करावीत या मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते जयेश शेलार यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे.

याबाबतचे निवेदन त्यांनी वाडा तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांना दिले असून मनोर - वाडा - भिवंडी या रस्त्यावर सुरक्षिततेच्या उपायोजना कराव्यात व तालुक्यातील अंतर्गत रस्त्यांची कामे पूर्ण करावीत, या मागण्यासाठी सोमवार दि.१५ जून २०२६ रोजी वाडा तहसिल कार्यालय येथे लाक्षणिक उपोषण आंदोलन करीत असल्याचे निवेदन त्यांनी दिले आहे.

मनोर - वाडा भिवंडी मार्गाचे काम सध्या सुरु असून, योग्य वळण मार्ग व काम सुरु असलेल्या ठिकाणी सूचना फलक लावले नसल्याने तसेच ट्रॅफीकबाबत उपाययोजना केल्या नसल्याने या मार्गावर अनेक गंभीर स्वरुपाचे दुदैवी अपघात झाले असून, यात अनेक प्रवाशांना जीव गमवावा लागला आहे. तर या मार्गावर अनेकदा ठिकठिकाणी ट्रॅफिक होत आहे. येत्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सदर मनोर-वाडा - भिवंडी या रस्त्यावर प्रतिबंधक उपाययोजना करण्यासंदर्भात लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून अनेकदा सूचना करुनही आवश्यक उपाययोजना होत नसल्याने खालील मागण्यांच्या पूर्ततेसाठी सोमवार दि.१५ जून २०२६ रोजी वाडा तहसिल कार्यालय येथे उपोषण आंदोलन करण्यात येणार आहे.

सदरच्या निवेदनात मनोर - वाडा - भिवंडी या मार्गावरील रस्त्याचे काम सुरु असणाऱ्या ठिकाणी योग्य सूचना फलक व वळण मार्गाचे दिशादर्शक ठळक सूचना फळक लावावेत, या मार्गावर कॉक्रिटीकरणाचे काम झालेल्या ठिकाणी रोड साईडला ठळकपणे वाहन चालकांना लक्षात येईल असे साईड रोप (रस्सी वा अन्य) लावावेत, या मार्गावरील कॉक्रिटीकरणाचे काम पूर्ण न झालेल्या ठिकाणचा रस्त्यावरील खड्डे भरणे व रस्ता दुरुस्त करावेत, अपूर्ण कामामुळे ज्या ट्रॅफिक होते त्या ठिकाणी पूर्णवेळ सुरक्षा रक्षकांची नेमणूक करावी, या मार्गावर असणाऱ्या बाजारपेठा, गर्दीची ठिकाणे, चौक अशा ठिकाणी प्रशासनाच्या मदतीने ट्रॅफीक नियंत्रणासाठी उपाययोजना कराव्यात, अपूर्ण कामामुळे अनेक ठिकाणी वाहने ना दुरुस्त होण्याचे व बंद पडण्याचे प्रकार घडत असतात यासाठी अशी वाहने हटविण्यासाठी उपाययोजना कराव्यात, या मार्गावर कामाच्या ठिकाणी अनेक वस्तू, दगड, खडी, बांधकाम साहित्य पडलेले असते. त्यामुळे अपघाताची शक्यता असते ते त्वरीत हटवण्यात याव्यात, यांसह अन्य आवश्यक उपाययोजना करुन पावसाळ्यात अपघात होणार नाहीत याची काळजी घ्यावी, अशा मागण्या या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

तसेच वाडा तालुक्यातील डाकीवली - केळठण रस्ता २) कंचाड खानिवली रस्ता ३) शिरीषपाडा खानिवली गौरापूर - केळठण रस्ता ४) कांबारे वासिंद रस्ता ५) कोंढले खैरे रस्ता यांसह अन्य अंतर्गत रस्त्यांची अपूर्ण कामे पूर्ण करावीत, ही प्रमुख मागणीही या निवेदनात करण्यात आली आहे.

--------------------------

मनोर - वाडा - भिवंडी ठेकेदाराच्या दिरंगाईमुळे अपघातांची संख्या वाढत असून पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर या रस्त्यावर आवश्यक उपाययोजना कराव्यात व वाडा तालुक्यातील अंतर्गत रस्त्यांची अपूर्ण कामे त्वरीत पूर्ण करावीत

* जयेश शेलार
आंदोलनकर्ते

# देगलुरच्या शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्यास उपमुख्यमंत्री कै अजितदादा पवार यांचे नाव देण्यास प्रशासनाची हालचाल सुरू...

## सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांच्या मागणीची प्रशासनाकडून दखल



लोकनेता न्यूज नेटवर्क

देगलूर प्रतिनिधी/संतोष चिद्रावार लोणीकर

उपजिल्हा असलेल्या देगलुर तालुक्यात सर्वात जास्त खेडेगावाचा समावेश असुन,देगलुरात नव्याने बांधण्यात आलेल्या शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्याला उपमुख्यमंत्री कै अजितदादा पवार यांचे नाव देण्यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांनी दि २/२/२०२६ रोजी तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय देगलुर कार्यालयांकडे रितसर निवेदनाद्वारे मागणी केली असता,दि १/६/२०२६ रोजी सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय कार्यालयाकडुन, जिल्हा उप आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांना लेखी पत्र पाठवून देगलुर येथिल नव्यानं बांधण्यात आलेल्या तालुका लघु पशुवैद्यकीय दवाखान्याला उपमुख्यमंत्री कै अजितदादा पवार यांचे नाव देण्यासंदर्भात कळविले असुन पुढिल कारवाई साठी जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कडे पाठपुरावा करण्याचे पत्र सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांना प्राप्त झाले असून पुढे या मागणीच्या प्रस्तावासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भेट घेऊन हा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांनी बोलताना सांगितले...

# प्राचार्य डॉ.चंद्रसेन कोठावळे यांनी जालना ते पाचोड सायकल प्रवास केला पूर्ण

०३ जानेवारी : जागतिक सायकल दिनानिमित्त राबवला विशेष उपक्रम



लोकनेता न्यूज नेटवर्क
पाचोड प्रतिनिधी | त्रिसिंग जायभाये

पाचोड दि ४. : जागतिक सायकल दिन जगभरात दरवर्षी तीन जून रोजी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. 2026 ची जागतिक सायकल दिनाची संकल्पना "हरित भविष्यासाठी सायकलिंग" ही असून भारतभरातील प्रमुख कार्यक्रमांमध्ये भव्य सायक्लोट्रॉन आणि सायकलिंग चे उत्सव साजरे होत आहेत.

याचाच एक भाग म्हणून शिवछत्रपती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी सायकलिंगचा उत्सव साजरा केला. त्यांनी जालना ते शिवछत्रपती महाविद्यालय पाचोड असा पन्नास किलोमीटर सायकलवरून प्रवास दुसऱ्यांदा पूर्ण केला. मागील वर्षीच्या जागतिक सायकल दिन 2025 च्या निमित्ताने प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी संभाजीनगर ते शिवछत्रपती महाविद्यालय पाचोड असा 60 किलोमीटरचा प्रवास सायकलवरून पूर्ण केला होता.

जालना, गोलापांगरी, अंबड, चिंचखेड आणि पाचोड असा सायकलवरून प्रवास करत असताना प्राचार्य डॉ. कोठावळे यांचा ठिकठिकाणी स्वागत आणि सत्कार करण्यात आला. आमच्या प्रतिनिधीने प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांच्याशी संवाद साधताना ते म्हणाले की, नियमित सायकलिंग मुळे आपल्या शरीरातील वाईट कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होण्यास मदत होते, तणाव कमी होण्यास आणि निरोगी वजन राखण्यासाठी ही मदत होऊ शकते. या सर्व गोष्टी आपल्या हृदयासाठी आणि फुफुसासाठी चांगल्या आहेत. पुढे बोलताना ते म्हणाले की, सायकल चालवल्याने आपल्या हृदयाचे स्नायू मजबूत होतात, हृदयाचे ठोके कमी होतात आणि रक्तातील चरबीची पातळी घटते. त्यामुळे फुफुसांचे कार्य सुधारते. वाहतूक, मनोरंजन, व्यायाम आणि स्पर्धात्मक खेळ यासारख्या उद्देशासाठी जगभरात सायकलींचा सराव केला जातो. सायकल हे वाहतुकीचे एक साधे, परवडणारे, स्वच्छ, पर्यावरण पूरक, आरोग्यदायी बिनखर्चिक टिकाऊ साधन आहे.

हा उपक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल मराठवाड्याची राजधानी असलेल्या छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदिपान पाटील भुमरे, श्रीक्षेत्र पैठणचे आमदार विलास बापू भुमरे, श्री ज्ञानेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष राजूनाना पाटील भुमरे, जि. प. सदस्य शिवराजभैय्या भुमरे, प्राचार्य डॉ. विश्वास कदम, उपप्राचार्य डॉ. शिवाजी यादव, डॉ सुरेश नलावडे, डॉ. हरिप्रसाद बिडवे, प्रा. एस. एस. कटारे, प्रा. आर. बी. गायकवाड, श्री. देवकर सर आदींनी अभिनंदन केले आहे. शिवछत्रपती महाविद्यालयामध्ये पोहोचल्यानंतर प्राचार्य डॉ. कोठावळे यांचे पाचोड येथील ज्येष्ठ नागरिक आप्पासाहेब नरवडे, प्रसिद्ध व्यापारी बबनराव चव्हाण, बीसीए महाविद्यालयाचे प्राचार्य अप्पासाहेब नेमाने, वैभव राऊत, श्रीकांत चिंचखेडे, मुरलीधर झिने, मनोज राक्षे सर्व प्राध्यापक वृंद आणि कर्मचारी आदींनी शाल आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

# एरंडी येथील आकाश पाटील यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा.




लोकनेता न्यूज नेटवर्क
जीवन जाधव औसा.

औसा तालुक्यातील एरंडी गावचे सुपुत्र समाजकार्यत सदैव अग्रेसर असणारे वं सर्वांना हवं हवंस वाटाणारे सर्वांचे आवडते असणारे सर्वांच्या अडचणीच्या काळात धावून जाणारे आकाश प्रकाश पाटील मराठा क्रांती मोर्चा मराठा समाज समिती जिल्हाध्यक्ष लातूर, मां. तंटामुक्ती अध्यक्ष एरंडी ग्रामपंचायत सदस्य एरंडी यांच्या विविध सामाजिक शैक्षणिक राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून शुभेच्छा व सत्कार करून वाढदिवस साजरा करण्यात आला , माननीय आमदार अभिमन्यू पवार साहेब,गुरुवर्य नेताजी सावंत. गुरुवर्य सोमनाथ काजळे. तलाठी गुंडकर साहेब यादव साहेब तहसीलदार अडसूळ साहेब. यांनी भरभरून शुभेच्या दिल्या .तसेच गावातील लोकांच्या गळ्यातील ताईत असणारे आकाश पाटील यांचा वाढदिवस मा. मंडळाधिकारी निळकंठ जाधव. शिक्षक राहुल जाधव. उद्धव लांडे. आदित्य पाटील. शिवदत्त जाधव , दत्ताभाऊ सुडके,व्यंकटराव चलवड. परमेश्वर पाटील. महादेवजी नवघरे. किरण पांढरे प्रवीण पाटील.दीपक पाटील पृथ्वीराज कोल्हाळे. निखिल शिंगारे. निखिल जाधव. सुशांत कोल्हाले.ओम जाधव.रवि जाधव.अभिजीत पारवे. अभिषेक लांडे , परमेश्वर कोल्हाळे, संतोष कोल्हाळे,शामराव लोखंडे सह एरंडी गावातील ग्रामस्थ युवक वं परिसरातील पाहुण्यांनी भरभरून शुभेच्छा दिल्या

## जालना येथील पत्रकार संतोष भुतेकर यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा जाफराबाद मराठी पत्रकार संघाकडून निषेध



लोकनेता न्यूज नेटवर्क
भोकरदन डॉ ज्ञानेश्वर जगताप

जालना येथील दैनिक जगाचा जगमित्र या वृत्तपत्राचे संपादक संतोष भुतेकर यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ जाफराबाद मराठी पत्रकार संघाच्या वतीने तहसीलदार तसेच पोलिस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले.
या निवेदनाद्वारे हल्लेखोरांविरुद्ध तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी, दोषींना अटक करून पत्रकारांच्या सुरक्षेची हमी द्यावी, अशी मागणी करण्यात आली. पत्रकारांवरील वाढत्या हल्ल्यांबाबत चिंता व्यक्त करत अशा घटनांमुळे प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्यावर गदा येत असल्याचे मत उपस्थित पत्रकारांनी व्यक्त केले.

यावेळी जाफराबाद मराठी पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी एकमुखाने घटनेचा निषेध नोंदवत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी प्रशासनाकडे केली.

# भूम तालुक्यात शासनाच्या आदेशाला अनेक शासकीय व निमशासकीय कार्यालयांची केराची टोपली

लोकनेता न्यूज नेटवर्क
भूम रविंद्र लोमटे

महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत अनेक महापुरुषांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या विचारांचा वारसा जपला जावा आणि नव्या पिढीपर्यंत पोहोचावा यासाठी शासनाकडून विविध महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी तसेच राष्ट्रीय उत्सव साजरे करण्याबाबत सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांना स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

मात्र भूम तालुक्यातील अनेक शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांकडून या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रजासत्ताक दिन (26 जानेवारी), स्वातंत्र्य दिन (15 ऑगस्ट), मराठवाडा मुक्ती संग्राम दिन (17 सप्टेंबर) आणि महाराष्ट्र दिन (1 मे) हे कार्यक्रम नियमितपणे साजरे केले जात असले, तरी विविध महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथींकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत आहे.
विशेषतः ग्रामपंचायत स्तरावरील काही कार्यालयांमध्ये महापुरुषांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्याबाबत उदासीनता दिसून येत असल्याची चर्चा आहे. शासनाचे स्पष्ट आदेश असतानाही अनेक ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन होत नसल्याने संबंधित विभागांनी याची गंभीर दखल घेण्याची मागणी होत आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित विभागांनी त्यांच्या अखत्यारीतील कार्यालयांची चौकशी करून बेजबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर काय कारवाई करणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

"31 मे 2025 ते 31 मे 2026 या कालावधीत शासनाने ज्या जयंती, पुण्यतिथी व उत्सव साजरे करण्याचे आदेश दिले आहेत, त्यांची अंमलबजावणी झाली आहे की नाही याची विभागप्रमुखांनी खातरजमा करावी. जिओ-टॅग केलेले छायाचित्र पुरावे मागवून कार्यक्रम न साजरे करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी."— प्रभाकर डोंबाळे, सामाजिक कार्यकर्ते
"विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये हे कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना दिलेल्या असतानाही अनेक ठिकाणी त्याची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसत नाही."— ॲड. विकास पाटील, जिल्हाध्यक्ष, रासप, धाराशिव

"सर्व ग्रामसेवकांना पत्राद्वारे सूचना देऊन माहिती मागविण्यात येणार आहे. महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी साजऱ्या केल्या जात नसल्याचे आढळल्यास संबंधितांनी यापुढे त्या नियमितपणे साजऱ्या कराव्यात, अन्यथा त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल."— वाजे साहेब, गटविकास अधिकारी, पंचायत समिती भूम

# सिंचन विहीर तांत्रिक अडचणीवर 'ऑन द स्पॉट' तोडगा:

औसा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी अनंद कुमार मिरगणे शेतकऱ्यांच्या सिंचन विहिरीवर....

लोकनेता न्यूज नेटवर्क
जीवन जाधव औसा..

औसा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी स्वतःसिरसलं येथील सिंचन विहिरीवर जाऊन घेतली मजुरांची ऑनलाईन हजेरी! सिरसल येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने (मग्रारोहयो) अंतर्गत सुरू असलेल्या सिंचन विहिरीच्या कामावर मजुरांची ऑनलाईन हजेरी (NMMS App) घेण्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून तांत्रिक अडचण येत होती. मजुरांच्या हजेरीचा हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी गटविकास अधिकारी मिरगणे औसा (BDO) यांनी स्वतः थेट सिंचन विहिरीच्या




कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली. ग्रामीण भागातील मजुरांचे नुकसान होऊ नये आणि कामात खंड पडू नये, यासाठी गटविकास अधिकारी साहेबांनी स्वतः पुढाकार घेतला. विहिरीच्या बांधावर उभे राहून साहेबांनी आपल्या उपस्थितीत मजुरांची ऑनलाईन हजेरी (Online Attendance/KYC Verification) मोबाईल ॲपद्वारे यशस्वीरीत्या पूर्ण केली.... यावेळी सिरसल चे सरपंच प्रकाश पाटील. उपसरपंच बालाजी हांडे.शेतकरी संतोष बळी घोडके, ग्रामस्थ ग्रामपंचायत अधिकारी माधव गिरी,महेश जगताप ग्रामपंचायत कर्मचारी पवार साहेब उपस्थित होते.....

# सिंचन विहीरीवर स्वत: गटविकास अधिकारी यांनी घेतली मजूरांची हजेरी

## रोजगार सहाय्यक यांच्या अडचणी सोडविण्यासाठी गटविकास अधिकारी पोहचले विहीरीवर

लोकनेता न्यूज नेटवर्क
औसा|महेश कोळी

औसा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आनंदकुमार मिरगणे यांनी सिंचन विहीरीवर उपस्थित प्रत्यक्षात मजूरांची हजेरी घेतली. याबदल सविस्तर माहिती अशी की 1मार्च 2026 पासून केंद्र शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने (मग्रारोहयो) अंतर्गत सुरू असलेल्या सर्व वैयक्तीक, सार्वजनिक कामांवर फेस अथेटिफिकेन्श म्हणजे प्रत्यक्षात मजूरांची कामांच्या ठिकाणी ऑनलाईन दोन वेळा हजेरी घेण्यांची जाचक अट घातली असून स्थानिक पातळीवर रोजगार सहाय्यक यांना यामध्ये मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. नेटवर्क प्राब्लेम,साईड प्राब्लेम , तांत्रिक अडचणी त्यामुळे मोठ्या प्रमाणात अडचणी वाढत होत्या.त्यामुळे आज गटविकास अधिकारी मिरगणे यांनी औसा तालुक्यातील सिरसल थेट सिंचन विहिरीच्या कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली येथे रोजगार सहाय्यक यांना येणाऱ्या अडचणी समजून ऑनलाईन हजेरी घेताना येणाऱ्या अडचणी समजून घेत तेथील सिंचन विहीर लाभार्थी शेतकरी संतोष बळी घोडके यांच्या शेतात जाऊन प्रतक्षात कामांवर उपस्थित असणाऱ्या मजूरांची ऑनलाईन हजेरी घेत समस्या जाणून घेतल्या.ग्रामीण भागातील मजुरांचे नुकसान होऊ नये आणि कामात खंड पडू नये, यासाठी गटविकास अधिकारी यांनी स्वतः पुढाकार घेतला.
यावेळी सिरसल चे सरपंच प्रकाश पाटील,उपसरपंच बालाजी हांडे, ग्राम पंचायत अधिकारी माधव गिरी,ग्राम रोजगार सहाय्यक व कामावरील मजूर,ग्रामस्थ महेश जगताप ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.....

__________

गटविकास अधिकारी आनंदकुमार मिरगणे यांनी दोन तीन मजूरांची प्रतक्षात हजेरी ऑनलाईन घेतली परंतु हजेरी पत्रकच अपलोड झाले नसल्याचे समजले. म्हणजे हजेरी घेऊनही हजेरी पत्रक अपलोड न झाल्याने अडचणी येत असल्याने वैयक्तिक कामांना आफलाईन सुरू ठेवल्यास मजूरांची हजेरी बुडणार नाही व कामांचा मोबदला मजूरी वेळेवर मिळण्यास मदत होईल



# सेवा निवृत्त सहायक महसूल अधिकारी आजीनाथ दराडे यांचा भगवानगड परिसरात जंगी सत्कार



लोकनेता न्यूज नेटवर्क
बाळासाहेब खेडकर पाथर्डी | प्रतिनिधी

प्रांत कार्यालय, पाथर्डी येथे सहायक महसूल अधिकारी म्हणून प्रामाणिक व कर्तव्यदक्ष सेवा बजावणारे आजीनाथ ज्ञानोबा दराडे हे अलीकडेच शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले. त्यांच्या दीर्घ आणि उल्लेखनीय सेवेला गौरविण्यासाठी भगवानगड परिसरातील मित्रपरिवार, नातेवाईक व हितचिंतकांच्या वतीने त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत भावी आयुष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.
सेवानिवृत्ती हा शासकीय सेवकाच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असतो. आपल्या सेवाकाळात आजीनाथ दराडे यांनी महसूल विभागातील विविध जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडत सर्वसामान्य नागरिकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या संयमी स्वभावामुळे आणि लोकाभिमुख कार्यपद्धतीमुळे त्यांनी सहकारी कर्मचारी तसेच नागरिकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे.
सत्कार समारंभात उपस्थित मान्यवरांनी दराडे यांच्या कार्याचा गौरव करत, शासकीय सेवेत त्यांनी दाखविलेली निष्ठा, कर्तव्यपरायणता आणि जनसामान्यांप्रती असलेली बांधिलकी यांचा विशेष उल्लेख केला. नारळ, शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी मालेवाडीचे माजी सरपंच पांडुरंग खेडकर, कृषिरत्न महादेव दराडे, गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर निवृत्ती खेडकर, कृषी उद्योजक संजय शेठ कीर्तने, आसाराम खेडकर, शेषराव दराडे यांच्यासह मित्रपरिवार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.
सत्काराला उत्तर देताना आजीनाथ दराडे यांनी आपल्या सेवाकाळातील अनुभव सांगत सहकारी, मित्रपरिवार व नागरिकांनी दिलेल्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सेवानिवृत्तीनंतरही सामाजिक कार्यात सक्रिय राहून समाजहितासाठी योगदान देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.
भगवानगड परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमाने दराडे यांच्यावरील सर्वांच्या प्रेमाचा व आदराचा प्रत्यय उपस्थितांना आला.

# सकल हिंदू समाजाच्या मागणीला यश;

हदगाव शहरातील शासनाच्या गायरान जमिनीवरील कथित अवैध चर्च हटविले

लोकनेता न्यूज नेटवर्क
हदगांव । चंद्रकांत भोरे

हदगाव शहरातील शासनाच्या गायरान जमिनीवर उभारण्यात आलेले कथित अवैध चर्च प्रशासनाने कारवाई करून हटविले आहे. स्थानिक सकल हिंदू समाज, नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यानंतर ही कारवाई करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.
स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, मागील काही वर्षांपासून शासनाच्या गायरान जमिनीवर हे बांधकाम करण्यात आले होते. या बांधकामाबाबत विविध शासकीय विभागांकडे अनेक वेळा तक्रारी करण्यात आल्या होत्या. मागील सहा महिन्यांपासून सकल हिंदू समाजातील जागरूक नागरिकांनी या प्रकरणाचा पाठपुरावा करून संबंधित अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले होते.
तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, सदर ठिकाण हे गरीब व गरजू नागरिकांना विविध प्रकारचे आमिष दाखवून धर्मांतर करण्याचे केंद्र बनल्याचा आरोप करण्यात आला होता. या संदर्भात नागरिकांनी प्रशासनाकडे लेखी तक्रारी सादर केल्या होत्या. त्यानंतर संबंधित विभागांनी जागेची पाहणी करून आवश्यक कागदपत्रांची तपासणी केली.
प्रशासनाने केलेल्या पडताळणीनंतर शासनाच्या गायरान जमिनीवरील बांधकाम नियमबाह्य असल्याचे आढळून आल्याने संबंधित अवैध बांधकामावर कारवाई करण्यात आली. महसूल विभाग, पोलीस प्रशासन आणि इतर संबंधित विभागांच्या उपस्थितीत ही कारवाई शांततेत पार पडली.

या कारवाईनंतर सकल हिंदू समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाचे आभार मानले. शासनाच्या मालकीच्या जमिनींवरील सर्व प्रकारची अतिक्रमणे हटविण्यासाठी अशाच प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू ठेवाव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

सकल हिंदू समाजाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, शासनाच्या जमिनींचे संरक्षण करणे आणि कायद्याचे पालन होणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. नागरिकांच्या एकजुटीमुळे आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही कारवाई शक्य झाल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, या प्रकरणामुळे हदगाव शहरात चर्चेचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाने कायद्याच्या चौकटीत राहून कारवाई केल्याचे अधिकृत सूत्रांनी सांगितले.



# जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचा मध्यरात्री गोदावरी पात्रात धडक छापा; 30 लाखांचा मुद्देमाल जप्त!

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
हदगाव; प्रतिनिधी! कृष्णा पाटील हरडफकर

, ४ जून : नांदेड जिल्ह्यातील अवैध वाळू माफियांविरुद्ध जिल्हा प्रशासनाने आतापर्यंतची सर्वात मोठी आणि धडक कारवाई केली आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी स्वतः बुधवारी (दि. ४) मध्यरात्रीनंतर पहाटे १:३० वाजताच्या सुमारास पिंपळगाव निमजी येथील गोदावरी नदीपात्रात जाऊन अवैध वाळू उत्खननावर छापा टाकला. या धडक कारवाईत वाळू माफ्यांचे दोन मोठे बोटी आणि २० तराफे जाळून नष्ट करण्यात आले असून, सुमारे १२५ ब्रास वाळू जप्त करण्यात आली आहे. या संपूर्ण कारवाईत तब्बल ३० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

मध्यरात्रीची थरारक कारवाई

मिळालेल्या माहितीनुसार, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले हे गोदावरी नदीपात्र परिसरातून जात असताना, त्यांना पिंपळगाव निमजी येथील नदीपात्रात मध्यरात्रीच्या अंधारात अवैध वाळू उपसा सुरू असल्याचे निदर्शनास आले. जिल्हाधिकाऱ्यांनी कोणताही वेळ न घालवता तत्काळ तहसीलदार संजय वारकड यांना फोन करून महसूल पथकासह घटनास्थळी पाचारण केले.

घटनेचे गांभीर्य ओळखून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्यासह पोलिसांचे मोठे पथकही तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. नदीच्या दोन्ही बाजूंनी पोलिसांचा वेढा वाळू माफिया अंधाराचा फायदा घेऊन नदीच्या दुसऱ्या बाजूने पळून जाऊ नयेत, यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी चोख नियोजन केले होते. नदीच्या दुसऱ्या बाजूने होणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी आणि आरोपींची नाकेबंदी करण्यासाठी लिंबगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बोधनकर यांनाही तात्काळ सतर्क करून पाचारण करण्यात आले. महसूल आणि पोलीस प्रशासनाच्या या संयुक्त पथकाने नदीपात्रात उतरून वाळू उपसा करणाऱ्या २ बोटी आणि २० तराफे जाळून जागेवरच नष्ट केले. तसेच नदीकाठी साठवून ठेवलेली १२५ ब्रास अवैध वाळू जप्त केली.

परतताना वाळूचे ट्रक पकडले; ४ मजूर ताब्यात

ही कारवाई करून जिल्हाधिकारी आणि त्यांचे पथक शहराकडे परतत असताना, शहर परिसरात अवैध वाळूची वाहतूक करणारी दोन संशयित वाहने आढळून आली. पथकाने ही दोन्ही वाहने थांबवून ती पुढील कायदेशीर कारवाईसाठी वजीराबाद पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिली आहेत. तसेच नदीपात्रात बेकायदेशीरपणे वाळू उपसा करणाऱ्या ४ मजुरांना रंगेहात पकडून पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

"अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीविरुद्ध जिल्हा प्रशासनाची ही मोहीम यापुढेही अशीच तीव्र गतीने सुरू राहणार आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीची लूट करणाऱ्या आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाळू माफियांची गय केली जाणार नाही. त्यांच्याविरुद्ध यापुढे अधिक कठोर पावले उचलली जातील."
— राहुल कर्डिले, जिल्हाधिकारी, नांदेड.

कारवाईत सहभागी झालेले अधिकारी व कर्मचारी:



जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या अत्यंत गोपनीय आणि धाडसी मोहिमेत खालील अधिकाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली: महसूल विभाग: तहसीलदार संजय वारकड, मंडळ अधिकारी सय्यद मोहसीन, सर्व तलाठी - माधव भिसे, सरपे, मारुती श्रीरामे, वानोळे, डॉ. जोशी, मारुती कदम, राजेश बरोडा आणि कोतवाल बालाजी सोनटक्के. पोलीस विभाग: नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, लिंबगावचे सपोनि बोधनकर, पोलीस उपनिरीक्षक केंद्रे, मठवाड आणि श्रीकृष्ण येलमटे. जिल्हाधिकाऱ्यांच्या या 'सिंघम' स्टाईल मध्यरात्रीच्या कारवाईमुळे नांदेड जिल्ह्यातील वाळू माफियांचे धाबे दणाणले असून, नागरिकांमधून या कारवाईचे मोठे स्वागत होत आहे.

# मान्सूनपूर्व तयारीसाठी महानगरपालिकेची आढावा बैठक; "परभणी शहरात स्वच्छता मोहिमेला वेग"

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
परभणी, प्रतिनिधी :- रमेश मुलगीर

दि. ४ : परभणी शहर महानगरपालिकेच्या वतीने आगामी मान्सूनच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व भागात स्वच्छता मोहीम राबविण्यात येत असून, मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली.

महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर व उपायुक्त प्रज्ञानवंत कांबळे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत पावसाळ्यात नैसर्गिक आपत्तीमुळे होणारी जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली. विविध विभागांनी समन्वयाने काम करून मदत यंत्रणा सज्ज ठेवावी, अशा सूचना आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

शहरातील मोठ्या नाल्यांची तातडीने स्वच्छता करण्यात यावी, तसेच दरवर्षी पाणी साचणाऱ्या ठिकाणी तत्काळ उपाययोजना करण्यात याव्यात, असे निर्देश देण्यात आले.

घनकचरा व्यवस्थापन विभागाचे प्रमुख तनवीर मिर्झा बेग यांनी प्रभाग समिती अ, ब, क अंतर्गत तीन झोनमध्ये मान्सूनपूर्व पथके तैनात करण्यात आल्याची माहिती दिली.

प्रत्येक प्रभाग समितीस आवश्यकतेनुसार जेसीबी व टिप्पर उपलब्ध करून देण्यात येणार असून, मनुष्यबळाचा दैनंदिन अहवाल आयुक्तांकडे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. स्वच्छता निरीक्षकांना मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबविण्याचे निर्देशही देण्यात आले.

आरोग्य विभागामार्फत स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी औषधोपचार व आरोग्य किट उपलब्ध करून देण्याबरोबरच मलेरिया विभागाकडून फवारणी करण्यात यावी, तसेच अग्निशमन विभाग सज्ज ठेवण्याचे आदेश



देण्यात आले. शहरातील स्ट्रीट लाईट दुरुस्ती तसेच धोकादायक इमारतींची पाहणी करून स्ट्रक्चरल ऑडिट अहवाल सादर करण्याच्या सूचना नगररचना विभाग, अभियंते व सहाय्यक आयुक्तांना देण्यात आल्या.

पावसाळ्यात पाणी साचणाऱ्या भागात तातडीने स्वच्छता मोहीम राबवून आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच शहरातील मुख्य रस्त्यांवरील खड्डे, ढापे व तुटलेल्या भागांचे सर्वेक्षण करून त्वरित दुरुस्ती करण्याचे आदेश संबंधित अभियंत्यांना देण्यात आले.

याशिवाय, आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करून टोल फ्री क्रमांक कार्यान्वित ठेवण्याचे निर्देश देण्यात आले.

अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पूर्वपरवानगीशिवाय रजेवर जाऊ नये, तसेच नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवाव्यात, असे आवाहन करण्यात आले.

या बैठकीस महापौर सय्यद इकबाल सय्यद खाजा, उपमहापौर गणेश देशमुख, आयुक्त नितीन नार्वेकर, स्थायी समिती सभापती प्रतिभा अतुल सरोदे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# जाफराबाद-जालना मार्गावर टाटा इंडिका कारचा भीषण अपघात; तिघे जखमी



**लोकनेतान्युज नेटवर्क**
जालना डॉ.ज्ञानेश्वर जगताप

जाफराबाद जालना रस्त्यावरील हिंदुस्तान वॉटर पार्कजवळ गुरुवारी टाटा इंडिका कारचा भीषण अपघात झाला. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार रस्त्यावरून खाली जाऊन शेतात घुसली. यावेळी वाहनाने तीन ते चार पलट्या घेतल्याने कारचे मोठे नुकसान झाले. अपघाताची तीव्रता मोठी असतानाही सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र कारमधील तीन जण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अपघातग्रस्त टाटा इंडिका कार ही तेलंगणा राज्यातील नोंदणीची असून वाहनातील सर्व प्रवासीही तेलंगणा राज्यातील आहेत. ते देऊळगाव राजा येथून भोकरदनकडे कामानिमित्त जात असताना हा अपघात घडला.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. अपघातामुळे काही काळ परिसरात गर्दी झाली होती. पुढील तपास संबंधित यंत्रणांकडून करण्यात येत आहे.

# ग्रामविकास अधिकारी विलास जोंधळे 40 हजारांची लाज घेताना एसीबीच्या जाळ्यात

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
कन्नड प्रतिनिधी ___________

कन्नड तालुक्यातील मकरंनपूर व रेल ग्रामपंचायतचा ग्रामविकास अधिकारी ४० हजाराची लाज स्वीकारताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने ग्रामपंचायत कार्यालयातच रंगे हात पकडले विलास पिराजीराव जोंधळे असे लाचखोर अधिकारी चे नाव आहे तक्रारदार किशोर वाळुंज यांनी नव बौद्ध खटक परिसर विकास योजनेअंतर्गत आंबेडकर नगर येथे ५ लाख आणि कन्नड साखर कारखाना परिसरातील गौतम नगर अण्णा भाऊ साठे नगर येथे ५ लाख रुपयांची पीव्हीआर ब्लॉक बसवण्याचे काम केले होते हे काम पूर्ण होऊन दोन महिने झाले तरी ग्राम विकास अधिकारी विकास हे त्यांचे अंतिम बिल काढण्यात टाळाटाळ करत होते बिल मंजूर करण्यासाठी जोंधळे यांनी एकूण रक्कम यांच्या ५ टक्के कमिशन म्हणून ४० हजार रुपयांची मागणी केली होती तक्रारदाराने लाख प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदवली त्यानुसार एसीबीच्या पथकाने मकरंनपुर ग्रामपंचायत कार्यालयात आरोपी जोंधळ्याच्या अंगात झडतीत मोबाईल जप्त केला कन्नड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला

# अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातील अंमलदारांच्या बदल्यांना मुहूर्त

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

जिल्हा पोलीस दलातील चालू वर्षीच्या प्रशासकीय बदली प्रक्रियेला अखेर मुहूर्त मिळाला असून पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी गुरूवारी (4 जून) पोलीस मुख्यालयात बदली दरबार आयोजित केला आहे. या प्रक्रियेत जिल्ह्यातील सुमारे 300 पोलीस अंमलदारांच्या बदल्या करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

एका पोलीस ठाण्यात किंवा शाखेत सलग अथवा खंडित स्वरूपात पाच वर्षे सेवा पूर्ण केलेल्या अंमलदारांकडून यापूर्वीच तीन पसंतीच्या ठिकाणांसह अर्ज मागविण्यात आले होते. तत्कालीन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या कार्यकाळात ही प्रक्रिया सुरू झाली होती. मात्र, 30 एप्रिल रोजी त्यांच्या बदलीनंतर अंमलदारांच्या बदल्या रखडल्या होत्या. नव्याने रूजू झालेले पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी ही प्रक्रिया पुन्हा गतीमान केली आहे. बदलीपात्र अंमलदारांना गुरूवारी सकाळी 7:30 वाजता पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक अंमलदाराची भूमिका जाणून घेऊन तसेच त्यांच्या पसंतीच्या ठिकाणांचा विचार करून बदल्या करण्यात येणार असल्याचे समजते.

या प्रक्रियेत पोलीस शिपाई, पोलीस नाईक, पोलीस हवालदार, सहायक पोलीस उपनिरीक्षक तसेच श्रेणी पोलीस उपनिरीक्षक पदावरील अंमलदारांचा समावेश आहे. एका पोलीस ठाण्यात पाच वर्षे सेवा पूर्ण केलेले, एका तालुक्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये एकूण 12 वर्षांचा कालावधी पूर्ण केलेले तसेच विविध शाखांमध्ये पाच वर्षांपेक्षा अधिक सेवा बजावलेले अंमलदार बदलीस पात्र ठरले आहेत.

40 पोलिसांना पदोन्नती

दरम्यान, जिल्हा पोलीस दलातील काही पोलिसांना पदोन्नती देण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी 20 पोलीस नाईकांना पोलीस हवालदारपदी तर 20 पोलीस हवालदारांना सहायक पोलीस उपनिरीक्षक (सहायक फौजदार) पदावर पदोन्नती देण्याचे आदेश काढले आहेत. पदोन्नती मिळालेल्या पोलिसांमध्ये आनंदाचे वातावरण असून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

# महाराष्ट्र शासन पशु संवर्धन विभाग जिल्हा परिषद जालना एक दिवशीय कार्यशाळा भोकरदन येथे सपन्न




**दै. लोकनेता न्युज नेटवर्क**
भोकरदन डॉ ज्ञानेश्वर जगताप)

आज दिनांक 4/6/2026 रोजी पशुसंवर्धन विभाग जालना यांच्या संयुक्त विद्यमाने भोकरदन व जाफराबाद या तालुक्यातील शासकीय पशुवैद्यक पशुधन पर्यवेक्षक आणि खाजगी कृत्रिम रेतन करणारे पशु सेवक यांची महाराष्ट्र गोजातीय प्रजनन व विनीअमन अधिनियम 2023 या कायद्याचे महत्व व फायदे याच्या मार्गदर्शनासाठी एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन तालुका भोकरदन येथे करण्यात आले सदरील कार्यशाळा माननीय डॉक्टर प्रशांत चौधरी उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय जालना यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ बनसोडे बाळासाहेब सहाय्यक आयुक्त कृत्रिम रेतन केंद्र जालना यांच्या मार्गदर्शनात डॉ फुन्ने सुनील सहाय्यक आयुक्त तालुका पशुवैद्यकीय चिकित्सालय व त्यांचे सहकारी श्री डॉ.संजय जोशी श्री डॉ. जोगदंड अमरदीप व इतर सहकारी यांच्या सहकार्याने संपन्न झाले सदरील कार्यशाळेस भोकरदन व जाफराबाद तालुक्यातील शासकीय पशुवैद्यक पशुधन पर्यवेक्षक आणि खाजगी कृत्रिम रेतन पशु सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# आयुष्मान भारत महाराष्ट्र समितीच्या अध्यक्षपदावरुन वाद; ओमप्रकाश शेटे यांच्यावर दिशाभूल केल्याचा आरोप

**दैनिक लोकनेता न्यूज़ नेटवर्क**

बीड प्रतिनिधी - आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीच्या अध्यक्षपदावर ओमप्रकाश शेटे यांच्या नियुक्तीची प्रक्रिया संशयाच्या भोवऱ्यात सापडली असून, या नियुक्तीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. माहिती अधिकार कार्यकर्ते शुभम शिंदे आणि राजेंद्र नवले यांनी शेटे यांनी मुख्यमंत्री कार्यालयाची दिशाभूल केल्याचा आरोप करत मूळ कागदपत्रांची चौकशी करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

ओमप्रकाश शेटे यांची यापूर्वी आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीच्या कक्ष प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली होती. या नियुक्तीसोबत शासनाच्या धोरणानुसार मानधन व इतर सोयी-सुविधांचाही उल्लेख करण्यात आला होता. दरम्यान,



20 मार्च 2025 रोजी सकाळी 11.31 वाजता आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या सूचनेनुसार संबंधित फाईलवर टिपणी काढण्यात आली. या टिपणीत आरोग्य विभागाचे सहसचिव अशोक अत्राम यांनी ओमप्रकाश शेटे यांची समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्याबाबत नमूद केल्याची माहिती समोर आली आहे. याच दिवशी दुपारी 3.24 वाजता ही फाईल आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या कार्यालयात सादर करण्यात आली. मात्र, आरोग्यमंत्र्यांनी या फाईलवर स्वाक्षरी केल्याची नोंद नसल्याचा दावा करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, त्यानंतर अवघ्या सहा मिनिटांत म्हणजे दुपारी 3.30 वाजता हीच फाईल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीसह मंजूर झाल्याचे दस्तावेजांमधून समोर आल्याचे सांगितले जात आहे. एकाच दिवशी टिपणी झालेल्या फाईलवर इतक्या कमी वेळात अंतिम आदेश निघाल्याने नियुक्ती प्रक्रियेबाबत संशय व्यक्त केला जात आहे. आरोग्यमंत्र्यांच्या स्वाक्षरीशिवाय फाईल थेट मुख्यमंत्र्यांकडे कशी पोहोचली आणि मंजुरी कशी मिळाली, याबाबत विविध स्तरांवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

या संपूर्ण प्रकरणात ओमप्रकाश शेटे आणि आरोग्य विभाग वादाच्या केंद्रस्थानी आले असून, माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी मूळ दस्तावेजांची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. संबंधित नियुक्ती प्रक्रियेत कोणताही नियमभंग अथवा दिशाभूल झाली असल्यास जबाबदारांवर फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. या आरोपांमुळे राज्याच्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, आता शासन आणि आरोग्य विभाग यावर काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

बाईट: ॲड. राजेंद्र नवले, माहिती अधिकार कार्यकर्ते

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)